# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.12.2024** **वार– गुरुवार**

---

**वीर बाल दिवस**

शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंग यांच्या पुत्रांच्या हौतात्म्याचं स्मरण म्हणून आज देशभरात वीर बाल दिन साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्लीत वितरण करण्यात आलं. विविध सात श्रेणींमध्ये 17 बालकांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात या राज्यातल्या दोघींचा समावेश आहे. मुंबईची 13 वर्षीय केया हटकर हीनं डान्सिंग ऑन माय व्हील्स आणि आय एम पॉसिबल या दोन पुस्तकांचं लेखन केलं आहे. तिला कला आणि संस्कृती क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कृत करण्यात आलं. तर अमरावतीच्या 17 वर्षीय करिना थापा हिनं प्रसंगावधान दाखवत आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून 36 जणांचे प्राण वाचवले होते. त्याबद्दल तिचाही गौरव करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्र-कुलगुरु प्राध्यापक डॉक्टर पराग काळकर यांनी गुरू गोविंदसिंग यांच्या पुत्रांच्या हौतात्म्याचं स्मरण करत त्यांना आदरांजली वाहिली.

**क्षय रोग नियंत्रण**

क्षयरोगावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं शक्ती हा उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत शहरातील आठ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्याचं उद्दिष्ट आहे. आतापर्यंत पन्नास हजारांहून अधिक व्यक्तींची तपासणी केली आहे. यामध्ये 25 नवीन रुग्ण आढळून आल्याचं महापालिकेचे क्षयरोग अधिकारी डॉक्टर प्रशांत बोठे यांनी सांगितलं.

**ससून**

ससून रूग्णालयात रूग्णांच्या वैद्यकीय पार्श्वभूमीची नोंद करणारी आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली म्हणजे एचएमआयएस प्रणाली बाह्य रूग्ण विभागात आजपासून सुरू करण्यात आली. या प्रणालीमुळे डॉक्टरांना आता एका क्लिकवर रूग्णांची वैद्यकीय पार्श्वभूमीवर जाणून घेता येईल, तसंच रूग्णांची नोंद

ठेवण्यासाठी लागणारा वेळही वाचेल असं अधिष्ठाता डॉक्टर एकनाथ पवार आणि वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लप्पा जाधव यांनी म्हटलं आहे.

**डॉ.बाबा आढाव**

घरगुती कामगारांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद असायला हवी; अशी अपेक्षा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांनी आज पुण्यात व्यक्त केली. या मागणीसाठी लढा उभारा, असं आवाहन त्यांनी केलं. कष्टकरी जनतेच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या मसुद्यावर श्रमिक भवनामध्ये आज एका चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते. श्रमिक आणि कामगारांच्या विविध संघटनांचे पदाधिकारी या चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.

**रिक्षा मीटर**

अलंकार पोलीस ठाण्यासमोर असलेल्या ट्रॅकवर ऑटोरिक्षा मीटर तपासणीसाठी येणाऱ्या ऑटोरिक्षांची संख्या अत्यल्प असल्यामुळे हा ट्रॅक येत्या १ जानेवारीपासून बंद करण्यात येणार असल्याचं पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं कळवलं आहे. आळंदी रस्त्यावरील चाचणी मैदानावर ऑटोरिक्षा मीटर तपासणीचं कामकाज नियमितपणे सुरू राहणार आहे, असं उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी सांगितलं.

**पुणे मनपा**

रस्ता रुंदीकरण, पाण्याची टाकी उभारणी, खेळाचं मैदान, नदीपात्र सुशोभीकरण आदी विकासकामांसाठी पुणे महापालिकेने शहरातील 15 शासकीय जागांची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली आहे. याबाबत काही जागांची मोजणी आणि सर्वेक्षण सुरू असून सर्व संबंधित विभागांकडून अभिप्रायही घेण्यात येत आहेत. पुणे शहरात पाणीपुरवठ्यासाठीच्या भूसंपादनासाठी शासकीय जागा मोफत देण्यात येत असून, अन्य जागांसाठी बाजारभावानुसार महापालिकेला शुल्क द्यावं लागणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे.

**मनपा कर आकारणी**

पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने करआकारणी विभागाला भोगवटा पत्र दिल्यानंतरही तांत्रिक कारणांमुळे कर आकारणी वेळेत होत नाही. भोगवटा पत्र मिळाल्यानंतर वेळेत मिळकत कर आकारणी व्हावी म्हणून विशेष मोहीम राबविली जात आहे. त्यासाठी संगणक प्रणालीही तयार केली आहे, अशी माहिती पुणे महापालिकेच्या मिळकत कर विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी दिली.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन यांच्यावतीने शहरात रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या मेळाव्यामध्ये बाराशेहून अधिक युवकांनी सहभाग नोंदवला. महापालिकेच्या वतीने कौशल्य विकास प्रकल्प राबवला जातो, याअंतर्गत, 18 ते 35 वयोगटातील गरजू युवकांना मोफत प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतात. शहरामध्ये अकरा ठिकाणी कौशल्य विकास प्रकल्प केंद्र आहेत. लवकरच आणखी चार नवी केंद्र उभारण्यात येणार आहेत. सरत्या वर्षात आतापर्यंत 1 हजार 204 युवकांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये शून्य कचरा उपक्रम राबवण्यात येत आहे. महापालिकेच्या एकंदर 105 शाळा असून आतापर्यंत 56 शाळांमध्ये शून्य कचरा प्रकल्प राबविण्यात आला. आता पुढच्या टप्प्यात 16 शाळा निवडण्यात आल्या आहेत; येत्या दोन महिन्यात या शाळांमध्येही शून्य कचरा उपक्रम राबावला जाईल असं पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज ढगाळ हवामान असून किमान तापमान 17 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही असंच हवामान असेल आणि हलका पाऊसही पडेल असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**